सामना

# अनेकदा मागणी करूनही भुयारी मार्गाला ठेंगा

## खेड-शिवापूर ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

खेड-शिवापूर, दि. ४ (सा. वा.) - पुणे-सातारा महामार्ग रुंदीकरणात खेड-शिवापूर (दर्गा) येथे भुयारी मार्गाची मागणी करूनही संबंधितांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होत नसल्याने खेड-शिवापूर ग्रामस्थांनी पुणे-सातारा महामार्गावर रस्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला आहे.

केंद्र शासनाच्या रस्ता सुधार योजनेतर्गत पुणे-सातारा महामार्गाचे चौपदरीकरण सुरू आहे. खेड-शिवापूर येथे महामार्गालगत लहान मुलांची शाळा व महाविद्यालय असून, सर्वधर्मीय कमरअली दर्वेशबाबांचा दर्गा आहे. तसेच या देवस्थानाचा शासनाच्या वतीने तीर्थक्षेत्र म्हणून विकास होणार आहे. या ठिकाणी देशाच्या कानाकोपऱ्यातून हजारो भाविक येतात. पुणे-सातारा महामार्ग हा सततच्या रहदारीचा असल्याने विद्यार्थी व शिक्षकांनाही अशा अपघातांना सामोरे जावे लागते. शाळेतील विद्यार्थ्यांना अनेकदा रस्ता ओलांडावा लागतो. येथील ग्रामस्थांची शेती महामार्गाच्या पलीकडे असल्याने ग्रामस्थ, शेतमजूर व जनावरांना कामासाठी या महामार्गावरून जावे लागते. या ठिकाणी रस्तादुभाजक व भुयारी मार्ग व्हावा यासाठी संबंधित ठेकेदार व अधिकारी यांच्याशी पत्रव्यवहार व प्रत्यक्ष भेटून मागणी केली.

याबाबत संबंधितांनी दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होत नसल्याने व हा भाग प्रवाशांच्या सोईचा असल्याने संबंधित ठेकेदार व अधिकारी याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करीत आहेत. तरी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे त्वरित लक्ष देऊन खेड-शिवापूर (दर्गा फाटा) येथे रस्तादुभाजक व भुयारी मार्ग करण्याच्या आश्वासनांची त्वरित पूर्तता करावी, अन्यथा पुणे-सातारा महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा सरपंच रमेश कोंडे व ग्रामस्थांनी दिला आहे.

This PDF file is Created by trial version of 123 PDF Creator.
Please use purchased version to remove this message.